follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 · वर्ष २६ · अंक ३३४ · सातारा · मंगळवार दि.३ सप्टेंबर २०२४ · पाने ४ · किंमत ५/-

# मराठवाड्यात पावसामुळे ६३ गावे बाधित

## दोन दिवसांत पाच जणांचा मृत्यू, पंचनाम्यांचे आदेश



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात दोन दिवसांमध्ये झालेल्या पावसामुळे ६३ गावे बाधित झाली असून, पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली. तर आतापर्यंत २२५हून अधिक जनावरे दगावली आहेत, तर १५०हून अधिक घरांची पडझड झाली. दरम्यान, या पावसामुळे खरीप पिकांना मोठा फटका बसला असून, नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत.

शनिवार रात्रीपासून मराठवाड्यात दमदार पावसाला सुरुवात झाली. रविवारी रात्री उशीरापर्यंत अनेक मंडळात अतिवृष्टी झाली. सोमवारी दिवसभरही विभागात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. दरम्यान, दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी ओढे दुथडी भरुन वाहत असून अनेक ठिकाणी पुर स्थिती निर्माण झाल्याचे चित्र होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथील मौजे खटखेडा येथील जिल्हा परिषदेची शाळा पुराच्या पाण्यात वेढल्या गेल्याने सोमवारी शाळेला सुट्टी देण्यात आली. गंगापूर तालुक्यातील मंगेगाव येथे एका घराची भिंत ढासळली. सुदैवाने त्यात कोणी जखमी झाले नाही. तर सोयगाव तालुक्यातील वेताळवाडी गावाजवळ श्री रुद्रेश्वर नाल्याला आलेल्या पुराच्या पाण्यात सकाळी एक चारचाकी वाहन वाहून गेले. सुदैवाने चालक घुगे थोडक्यात बचावले.

घराजवळ वाहणाऱ्या पाण्यात वाहून गेल्याने साई कडुबा बोरसे हा दीड वर्षाचा बालकाचा दुर्दे वी मृत्यू झाला. ही घटना कन्नड तालुक्यातील घाटशेंद्रा येथे घडली. कन्नड तालुक्यातील माळीवाडा येथे पाण्यात वाहून संतोष थोरात (वय २८) हा तरुण पुरात वाहून गेला. संतोष बैलाला वैरण टाकण्यासाठी गेले होते. घरी परत येत असतानाच पुलावरून वाहणाऱ्या पाण्यातून जाताना ते वाहून गेले. फुलंब्री तालुक्यातील मौजे शेवता येथील रावसाहेब नाना बडके हा युवक पुरात वाहून गेला. सायंकाळी उशिरापर्यत शोधकार्य सुरू होते.

यासह जालन्यात तसेच हिंगोली जिल्ह्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला; लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील ढोरसांगवी गावालत असणाऱ्या ओढ्यावर म्हैस धुण्यासाठी गेलेल्या नरेश अशोक पाटील (वय २८) वाहुन गेल्याने त्याचा मृत्यू झाला. बीड जिल्ह्यातील आदित्य डोळस ( वय २१, रा. संत नामदेवनगर) या तरुणाचा नदीत बडून मृत्यू झाला.

दरम्यान, पावसामुळे जालना जिल्ह्यातील १५, परभणीतील २६, बीड जिल्ह्यातील १२, लातूर जिल्ह्यातील ९ तर हिंगोली जिल्ह्यातील एक गाव बाधित झाले आहे. तर आतापर्यंत लहान मोठे मिळून ३०० हून अधिक जनावरे दगावले आहेत. हिंगोली जिल्ह्यात ५६ जनावरे दगावले. नांदेड मध्ये १८, बीडमध्ये ६ तर जालना जिल्ह्यात ८ जनावरांचा मृत्यू झाला.

तर परभणी जिल्ह्यात २०० हून अधिक जनावरांचा मृत्यू झाल्याचे सूत्रांनी सांगितले. विभागात एकूण १६० हून अधिक घरांची पडझड झाली आहे. या पावसामुळे खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. जालना जिल्ह्यात ४२ हेक्टरवरील पिके बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज असून एकूण नुकसानीबाबत येत्या दोन ते तीन दिवसांत अहवाल प्राप्त होईल, अशी माहिती विभागीय आयुक्तालयाच्या सूत्रांनी दिली.

### पालकमंत्र्यांनी घेतला आढावा

**लातूर जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेत नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. तसेच, नदीकाठच्या गावांमध्ये विशेष खबरदारी घेण्याच्या आणि सर्व अधिकाऱ्यांनी फिल्डवर राहून तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असे नमूद केले.**

# .. तर उद्धव ठाकरे यांना मातोश्रीतून हाकलून दिले असते : नितेश राणे

सिंधुदुर्ग: हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आज हयात असते तर त्यांनी उद्धव ठाकरे यांना लाख मारून मातोश्रीच्या बाहेर काढले असते, अशी विखारी टीका भारतीय जनता पक्षाचे आमदार नितेश राणे यांनी केली आहे.

मालवणच्या राजकोट किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने महायुती सरकारच्या विरोधात मोर्चा आणि जोडे मारो आंदोलन करण्यात आले. गेटवे ऑफ इंडिया येथे या मोर्चासमोर बोलताना उद्धव ठाकरे यांनी महायुतीच्या नेत्यांना उद्देशून, भारताबाहेर चालते व्हा, अशा अर्थाचे विधान केले. या विधानावर राणे यांनी पलटवार केला.

औरंगजेबाच्या पिल्लावळीने इतरांवर शिवद्रोही असल्याचे आरोप करू नयेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच राज्यात पाकिस्तान जिंदाबाद च्या घोषणा दिल्या गेल्या होत्या. उद्धव ठाकरे हे पाकिस्तानचे एजंट आहेत, असे आरोप राणे यांनी केले.बाळासाहेब ठाकरे हे कट्टर हिंदुत्ववादी होते. ते आज हयात असते तर त्यांनी उद्धव ठाकरे यांना घराबाहेर घालवून दिले असते, असेही राणे म्हणाले.

यापूर्वी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी राणे यांच्यावर टीका केली होती. शिल्पकार जयदीप आपटे यांना शिवछत्रपती पुतळ्याचे काम देण्यासाठी मध्यस्थी केल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्या अरोपावरही राणे यांनी प्रत्युत्तर दिले.

फर्निचरसाठी भांडणाऱ्या या बाईंच्या घरी चार सोफा आणि दोन टेबल पाठवून दिली तर त्या गप्प बसतील, अशी टीका राणे यांनी केली. यापूर्वी ठाकरे यांच्या गटात असलेल्या शिवसेना नेत्या मनीषा कायंदे यांच्यावर राणेंच्या विरोधात राळ उडवून देण्यासाठी रश्मी ठाकरे यांचा दबाव होता, असा दावा करीत राणे यांनी अंधारे यांच्यावरही असा दबाव असल्याचे सूचित केले.

# कृष्णामाईची श्रावणी यात्रा उत्साहात संपन्न

**कराड :** कराड नगरीचे आराध्यदैवत श्री कृष्णामाई देवीची श्रावणातील सरत्या सोमवारची यात्रा मोठ्या भक्तिभावाने अन् उत्साहात सुरु आहे. कृष्णा-कोयना नद्यांच्या अपूर्व प्रीतिसंगमावर श्री कृष्णामाई देवीच्या दर्शनासाठी कराड पंचक्रोशीसह ठिकठिकाणांहून आलेल्या भक्तगणांनी अवघा कृष्णा घाट परिसर बहरून गेला होता.

प्रथेप्रमाणे ठिकठिकाणच्या पालख्या देवाला घेऊन कृष्णामाईच्या भेटीला सवाद्य मिरवणुकांनी आल्या होत्या. कृष्णामाई देवीबरोबरच कृष्णानदीचीही खणा-नारळाने ओटी भरण्यासाठी महिला व युवतींनी गर्दी केली होती. दरवेळेप्रमाणे फुलांनी सजवलेल्या कमानी आणि मखरामध्ये भरजरी साडी आणि संपूर्ण सुवर्ण अलंकाराने भरलेले कृष्णामाईचे सुरेख स्वरूप पाहून भक्तगण धन्य होत होता. प्रसाद, मिठाईसह खाऊ व खेळण्यांच्या दालनांवर गर्दी राहिली होती.

# भाजपने सर्व पक्षांना केले भ्रष्टाचारमुक्त : सुप्रिया सुळे यांनी उडवली खिल्ली

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाने बाकी काही केले नसले तरी 'मेगा भरती' करून सर्व पक्षांना भ्रष्टाचारमुक्त केले आहे. त्यामुळे आता आमच्यावर इतर कुठले आरोप झाले तरी भ्रष्टाचाराचे आरोप होऊ शकत नाहीत. इतर कोणत्याही आरोपांपेक्षा ते सौम्यच आहेत, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपची खिल्ली उडविली.

राज्यात विधानसभा निवडणूक निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होईल. ऑक्टोबर महिन्यात आचारसंहिता लागू करण्यात येईल. नोव्हेंबर महिन्यात मतदान होईल आणि निकालही त्याच महिन्यात येतील, अशी शक्यताही सुळे यांनी व्यक्त केली. निवडणूक जेवढ्या लवकर जाहीर होतील, तेवढा जास्त वेळ उमेदवारांना मिळू शकेल, असेही त्या म्हणाल्या.

महाविकास आघाडीचे जागावाटप निश्चित करण्यासाठी दोन दिवसात घटक पक्षांची बैठक होईल. त्यानंतर आठ ते दहा दिवसात जागा वाटपाबाबत निश्चित निर्णय झालेला असेल, असेही सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

### शिक्षणाचे माहेरघर बनले गुन्हेगारीची राजधानी

**पुणे शहरात नुकतीच झालेली नगरसेवकाची हत्या आणि इतर गुन्हेगारी कारवायांबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना सुळे म्हणाल्या की, पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर अस्वस्थता आहे. आतापर्यंत विद्येचे माहेरघर ही पुण्याची ख्याती होती. केवळ राज्यातूनच नव्हे तर देशभरातून अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी पुण्याला येत असतात. मात्र मागील काही काळात घडलेल्या गुन्हेगारी घटना पाहता पुणे ही गुन्हेगारीची राजधानी झाली आहे. पोलिसांवर हल्ले करण्याइतपत कोयताग्यांची हिंमत वाढली आहे. पोलिसांचा, गृहमंत्रालयाचा आणि कायद्याचा कोणताही धाक राहिलेला नाही. त्यामुळे लोकांचा कायदा सुव्यवस्थेवर विश्वास उरलेला नाही.**

# राष्ट्रीय स्वयंसेवकाने वार्षिक बैठकीत स्पष्ट केली भूमिका

**पलक्कड :** सरसकट जातीय जनगणना देशाच्या एकता आणि अखंडतेला धोकादायक आहे. मात्र, कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दलित जनगणना करावी, अशी भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने परिवाराच्या वार्षिक बैठकीत जाहीर केली आहे. सामाजिक समरसतेच्या दृष्टीने अधिक मोठ्या प्रमाणावर कार्य उभे करण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले.

जाती जाती मधील क्रिया, प्रतिक्रिया हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. जातिआधारित जनगणना देशाची अखंडता आणि एकता यांच्यासमोर आव्हान उभे करू शकते. जनगणना हा मते मिळवण्याचा आणि निवडणुका जिंकण्याचा विषय केला जाऊ नये. कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मात्र, दलित जनगणना केली जावी, असे मत संघाच्या बैठकीत व्यक्त करण्यात आले.

### महिला सुरक्षेसाठी ठोस उपाय गरजेचे

सध्या राज्यात आणि देशभरात महिलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता करावी अशा घटना घडत असताना संघाच्या बैठकीत महिला सुरक्षा या विषयावर देखील चर्चा करण्यात आली. महिला सुरक्षा बाबत अधिक सजग राहण्याची आवश्यकता बैठकीत व्यक्त करण्यात आली. त्याचप्रमाणे कायदा, जागरूकता, संस्कार, शिक्षण आणि आत्मसंरक्षण या पंचसूत्रीच्या आधारे महिला सुरक्षा मोहीम हाती घेण्याचा निर्णयही या बैठकीत झाला.

बांगलादेशमध्ये सत्तांतर झाल्यानंतर तेथील अल्पसंख्यांक हिंदू समाज आणि विशेषता महिला यांच्याबाबत होणारा हिंसाचार आणि अत्याचार यांच्याबाबत या बैठकीत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. अल्पसंख्या समाजाच्या संरक्षणासाठी कठोर उपाययोजना केल्या जाव्या, अशी मागणी ही या बैठकीत करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती देशभर साजरी करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्याचप्रमाणे यावर्षी संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून समाज परिवर्तनाच्या कार्याला अधिक व्यापक आणि गतिमान करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

# लेखक दिग्दर्शक शरद गोरे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार



**मुंबई :** सुप्रसिध्द लेखक, दिग्दर्शक व अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे यांना प्रेरणा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन एका विशेष समारंभात सन्मानित करण्यात आले.

मागील तीस वर्ष गोरे यांनी साहित्य संवर्धनाचे उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी आजवर कोणतीही शासकीय मदत न घेता साहित्यिक व रसिकांच्या सहभागातून १७६ हून अधिक राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले आहे. इतकी साहित्य संमेलनं आयोजित करणारे ते साहित्य विश्वातील एकमेव व्यक्ती आहेत.

गोरे यांनी ५ मराठी चित्रपटांचे लेखक दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार व अभिनेता म्हणून काम केले आहे. त्यांच्या 'एक प्रेरणादायी प्रवास: सूर्या' या चित्रपटाने फ्रान्स देशातील कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव व जर्मनीतील बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून आपली जागतिक स्तरावर मोहर उमटवली आहे,

विविध विषयांवर आजवर हजारो व्याख्याने त्यांनी दिली आहेत. आपल्या अनोख्या भाषणशैलीसाठी ते विशेष परिचित आहेत. त्यांनी आजवर १० ग्रंथाचे लेखन केले आहे. छत्रपती संभाजी महाराज यांनी वयाच्या १४ व्या वर्षी संस्कृतमध्ये लिहिलेल्या बुधभूषण ह्या ऐतिहासिक ग्रंथाचा गोरे यांनी मराठीत काव्य अनुवाद केला आहे. ते प्रकाशक व संपादक असलेल्या युंगधर प्रकाशन या संस्थेने १५० हून अधिक दर्जेदार पुस्तके प्रकाशित केली आहेत.

गोरे यांना मिळालेल्या महाराष्ट्र गौरव पुरस्कारासाठी समाजातील सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# भारताला अभिमान वाटावे असेच काम करणार : हणमंतराव गायकवाड

**सातारा :** काही मित्रांच्या सहकार्याने सुरू केलेल्या भारत विकास ग्रुप या संस्थेचे काम आज वृद्धिंगत होताना सातारा जिल्ह्यामध्ये आज नऊ हजार लोकांना रोजगार मिळाला . आपल्याला जे शिक्षण हवे ते शिकवले जात नाही हाच मोठा प्रॉब्लेम आहे. आज शंभर जॉब प्रोफाइल तयार आहेत. तसेच १६ देश आपल्या देशाकडून कर्मचाऱ्यांची अपेक्षा करत आहेत, आणि हे काम भारत विकास ग्रुपच्या कडून करण्याचे काम मी सुरू ठेवले आहे. आज जिल्ह्याला नव्हे तर राज्याला आणि देशाला अभिमान वाटावा असेच काम करत राहणार असे गौरव उद्गार भारत विकास ग्रुपचे प्रमुख संस्थापक हणमंतराव गायकवाड यांनी काढले .

सातारा येथील गोडबोले सार्वजनिक ट्रस्टच्या वतीने देण्यात येणाऱ्या सातारा भूषण पुरस्काराचे प्रसंगी गायकवाड बोलत होते .

येथील रा. ना. गोडबोले सार्वजनिक ट्रस्ट व सातारकर नागरिक यांच्यातर्फे दरवर्षी सातारा भूषण पुरस्कार एखाद्या क्षेत्रात वैशिष्ठपूर्ण योगदान देणाऱ्या सातारा जिल्ह्यातील व्यक्तीस दिला जातो. सन २०२३ या वर्षाचा सातारा भूषण पुरस्कार बी. व्ही. जी. ग्रुपचे चेअरमन हणमंतराव गायकवाड यांना श्री समर्थ सेवा मंडळाच्या समर्थ सदन सांस्कृतिक केंद्र येथे वितरित करण्यात आला.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्य उत्पादन शुल्क मंत्री नामदार शंभूराज देसाई यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे प्रमुख संघटक डॉ. अनिल पाटील , तसेच जेष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे,अशोक गोडबोले ,डॉ. अच्युत गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती.




पुरस्काराचे हे ३३ वे वर्ष असून त्यांचे कार्याचा विचार करून ३३ वा सातारा भूषण हा २०२३ चा पुरस्कार देण्यासाठी त्यांचे नाव ट्रस्टचे विश्वस्त श्री. अरूण गोडबोले, डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर व आ. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी निश्चीत केले. रूपये ३० हजार व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी प्रास्ताविक भाषणांमध्ये ट्रस्टचे विश्वस्त अच्युत गोडबोले यांनी भाऊ काका गोडबोले यांनी स्वतः हलाखीच्या परिस्थितीत गरिबीतून दिवस काढल्यावर समाजातील गोर गरीब मुलांना अपेक्षित असणारे शैक्षणिक मदत करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील ठेवले त्यांच्या संकल्पनेतून प्रेरणा घेत आम्ही तिन्ही भावांनी हा ट्रस्ट स्थापन करून आज त्याचा फंड कोटीच्या वर गेला यावर्षी नुकतीच साडेपाच लाख रुपयांची मदत विविध मुला-मुलींना तसेच संस्थांना केली अरुण गोडबोले यांनी या ट्रस्टला व्यापक स्वरूप दिले १९९१ सातारा भूषण पुरस्कार देण्यास सुरुवात झाली. आज भारत विकास ग्रुपच्या वतीने हनुमंतराव गायकवाड यांनी केलेले कार्य हे खरोखरच विलक्षण आणि नव्या पिढीला आदर्श असे आहे. शनिवार पेठेतील छोट्या घरात राहून पुढे आपल्या शैक्षणिक जबाबदारीतून नोकरी लागत पुढे उभी केलेली ही संस्था आज खरोखरच दोन लाखाहून अधिक कर्मचाऱ्यांना रोजगार देणारी आहे युवकांना प्रेरणा देण्याचे काम गायकवाड करत आहेत हे खरोखरच कौतुकास्पद आहे आणि म्हणूनच यावर्षी हा ट्रस्टच्या नव्हे तर सातारा जिल्ह्याच्या वतीने त्यांना पुरस्कार देताना एक विशेष आनंद होत आहे .

यावेळी सर्व मान्यवरांचा सत्कार अशोक गोडबोले ,प्रद्युम्न गोडबोले, उदयन गोडबोले, डॉ.चैतन्य गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आला . यावेळी हणमंतराव गायकवाड यांच्या मातोश्री सीता देवी गायकवाड व वैशाली गायकवाड यांचा सत्कार गोडबोले परिवाराच्या वतीने करण्यात आला

यावेळी उपस्थितना मार्गदर्शन करताना ना. देसाई म्हणाले की,आज संपूर्ण राज्यात ३६ जिल्ह्यामध्ये आपला सातारा जिल्हा हा २२५ शाळा या आदर्श शाळेसाठी बनविण्याची कार्यशाळा आज घेतली या वर्षात १५४ कोटी रुपये असे शैक्षणिक योगदानासाठी आम्ही जिल्ह्यासाठी घेत आहोत. गोडबोले कुटुंबीय आणि देसाई परिवाराचे तीन पिढ्यांचे ऋणानुबंध व कौटुंबिक संबंध आहेत ट्रस्टच्या माध्यमातून आज हनुमंतराव गायकवाड यांची पुरस्कारासाठी केलेली निवड ही खरोखरच आदर्श आणि कौतुकास्पद आहे गाव पातळीवरच्या विशेष कार्य करणाऱ्या सामान्य असून असामान्य अशा व्यक्तींना हे पुरस्कार देण्याचे काम गोडबोले परिवार करत आहे छत्रपतींच्या राजधानीत हा पुरस्कार हनुमंत रावांना देताना एक चांगल्या व्यक्तीची निवड केली याबद्दल मी ट्रस्टचे कौतुक करतो आणि ट्रस्टचे उपक्रम असेच वृद्धिंगत हो तसेच सर्व सामाजिक बांधिलकी असणाऱ्या नावीन्यपूर्ण अशा ट्रस्टच्या उपक्रमाला मी सदैव मदतीचा हात पुढे करत आहे असे उद्गार त्यांनी काढले.

यावेळी कार्यक्रमास उपस्थित असलेले जेष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे यांनी गोडबोले परिवाराचे कौतुक करताना मनाने श्रीमंत असणाऱ्या गोडबोले परिवाराने हा सीमारेषा ओलांडून सुरू केलेला पुरस्कार सोहळा खरोखरच संपूर्ण जगात एकमेव असल्याचे आवर्जून सांगितले, कारण श्रीमंत असलेल्या बिल गेट्स सारखे लोक असे कार्य करतील, यात वेगळे नाही ,मात्र हेरिटेज म्हणून युनेस्कोचा हा पुरस्कार गोडबोले परिवाराला मिळावा असे मी अपेक्षित करतो मला २०१२ मध्ये हा पुरस्कार मिळाला, त्यावेळी कास पठाराची निवड जागतिक पर्यावरण स्थळाच्या यादीत झाली हे इनव्हिजिबल हेरिटेज म्हणून ओळखले जाते ,तर गोडबोले ट्रस्ट हे सुद्धा साताराचे नव्हे तर महाराष्ट्राचे भूषण आहे,

## स्थित्यंतर

राही भिडे
+९१ ९५९४९ ९९४५९



# संघाचा ताप अन् मित्रपक्षांचा मन:स्ताप

..लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचे खापर संघ परिवार अजित पवार यांच्यावर फोडून मोकळे झाले खरे पण हा ग्रीन सिग्नल समजून भाजपच्या नेत्यांनी अजितदादांशी युती नको, असे स्थानिक पातळीवर सांगण्यास सुरुवात केली, तर दुसरीकडे शिवसेनेचा शिंदे गट सातत्याने अजितदादांची कोंडी करीत आहे आणि त्यांना महायुतीतून बाहेर पडण्याचा इशारा देत आहेत. अजितदादांनी बाहेर पडून तिसरी आघाडी करून निवडणूक लढवावी, त्याचा फायदा महायुतीला व्हावा, असा तर शिवसेना-भाजपचा डाव नाही ना, अशी शंका निर्माण होते.

लोकसभा निवडणुकीनंतर सत्ताधारी महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या तिन्ही पक्षांत सातत्याने वादाची ठिणगी पडत आहे. शिवसेना शिंदे गटाचे मंत्री तानाजी सावंत यांनी तर त्यांच्या मनातील खदखद जाहीरपणे व्यक्त केली. अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत बसल्याने आम्हाला उलट्या होतात असे विधान करून त्यांनी एकच खळबळ उडवून दिली.. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला. तसेच सत्तेतून बाहेर पडण्याचाही इशारा दिला. त्यातच आता भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी राष्ट्रवादी काँग्रेसशी युती म्हणजे असंगाशी संग असल्याचे विधान केले. आतापर्यंत संयमी भूमिका घेणाऱ्या अजितदादांनाही मग संताप आला. प्रत्युत्तर देताना स्वतः अजित पवारांनी आपल्या कार्यकर्त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देण्यास फर्मावले. या सततच्या वादामुळे हे तिन्ही सत्ताधारी पक्ष एकमेकांपासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत का? असा प्रश्न उपस्थित होतो. लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीची मोठी हाराकिरी झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या पराभवासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेससोबतच्या आघाडीला जबाबदार धरले. त्यानंतर भाजपने डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला; पण त्यानंतरही भाजप व शिवसेनेच्या काही नेत्यांनी सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेसवर शरसंधान साधून हा वाद तेवत ठेवण्याचे काम केले. भाजप आणि शिवसेनेच्या शिंदे गटात अधूनमधून वाद होत असला, तरी त्या वादावर पडदा टाकला जातो. समज दिली जाते. अजित पवार यांच्याबाबत मात्र तसे होताना दिसत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते तथा आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी दोन दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसण्याची वेळ आल्यामुळे आम्हाला अक्षरशः उलट्या होतात असे विधान केले. आम्ही हाडामासाचे शिवसैनिक आहोत. त्यामुळे माझे काँग्रेस व राष्ट्रवादीसोबत केव्हाच जमले नाही. यामुळे कॅबिनेटच्या बैठकीत राष्ट्रवादीच्या मांडीला मांडी लावून बसत असल्यामुळे आम्हाला उलट्या होतात. कारण आम्ही आमच्या तत्वांशी बांधील आहोत, असे ते म्हणाले होते. उघडउघड हा अजितदादा यांच्यावर हल्ला होता. त्याअगोदर रायगड जिल्ह्यातील शिवसेनेच्या शिंदे गटाच्या आमदारांनी अजितदादा आणि त्यांच्या पक्षाला विश्वासघातकी ठरवले होते. दुसरीकडे अजित पवार यांनी त्यांच्या आमदारांच्या कामांच्या पाठवलेल्या फाईल मुख्यमंत्र्यांनी सह्यांसाठी अडवून ठेवल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. भाजप आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचे जसे गूळपीठ जमते, तसे शिंदे गट आणि भाजपच्या कार्यकर्त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांशी जमत नाही. टोकाचे वैचारिक मतभेद आणि परस्परविरोधी भूमिका हे त्याचे कारण आहे.

सावंत यांच्या या विधानानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी अजित पवारांना असे बोलणे ऐकून घेण्यापेक्षा अशा सत्तेवर लाथ मारून बाहेर पडलेले बरे असा सल्ला दिला. महायुती झाली म्हणूनच सावंत मंत्री झाले अशी मखलाशीही त्यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनीही या प्रकरणी शिवसेनेला निर्वाणीचा इशारा दिला. महायुतीतील घटकपक्षांकडून होणारी अवहेलना आता सहन होत नाही. सावंत यांच्यासारख्या माणसाला हाफकिन माणूस आहे की संस्था हे कळत नाही. त्याच्याकडून काय अपेक्षा करणार? संबंधितांनी अशा लोकांना आवर घालावा, अन्यथा आमचा संयम सुटेल, असा इशारा मिटकरी यांनी दिला होता. सावंत व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमधील वादाची धग संपत नाही, तोच आता भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी राष्ट्रवादी काँग्रेससोबतची युती म्हणजे असंगाशी संग असल्याचे विधान करून या वादाला नव्याने फोडणी दिली आहे. लोकसभा निवडणुकीत अहमदपूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार बाबासाहेब पाटील व त्यांचे कार्यकर्ते प्रचाराला बाहेर पडलेच नाहीत. त्यामुळे भाजपच्या खासदाराला पराभवाची चव चाखावी लागली. त्यामुळे अजित पवारांच्या पक्षाबरोबर झालेली युती अत्यंत दुर्दैवी आहे. खरे म्हणजे ही युती ना त्यांना पटली ना आम्हाला पटली. असंगाशी संग म्हणतात तसा संग आमच्यासोबत घडवण्यात आला, असे हाके यांनी म्हटले आहे. हाके यांच्या या जहरी टीकेनंतर अजित पवार यांच्या संयमाचा बांध सुटला. त्यांनी या मुद्यावर मोजक्या शब्दांत प्रतिक्रिया देत अप्रत्यक्षपणे आपल्या मनातील खदखद बोलून दाखवली. अशी थेट टीका करणाऱ्यांना सोडून देतील ते दादा कसले ? मला कुणावरही टीका करायची नाही. अशा बोलण्यामुळे माझ्या अंगाला भोकेही पडत नाहीत; पण खरेच असे कुणी काही बोलले असेल तर माझेही कार्यकर्ते त्याला योग्य ते उत्तर देतील, असा हल्लाबोल त्यांनी केला. एकप्रकारे टीका करणाऱ्या महायुतीतील घटकपक्षांना सडेतोड प्रत्युत्तर देण्याचेच आदेश अजित पवारांनी दिले आहेत. त्यामुळे महायुतीतील वाद एका तार्किक निष्कर्षाला जाईपर्यंत थांबणार नाही, हेच यामधून स्पष्ट होत आहे. पवार यांच्या विधानानंतर काही वेळातच राष्ट्रवादीची मुलूख मैदानी तोफ असणाऱ्या मंत्री छगन भुजबळ यांनी मित्र पक्षांच्या नेत्यांना आपल्या पदाधिकाऱ्यांना वादग्रस्त विधाने करण्यापासून थांबण्याची तंबी दिली. या विधानांशी सर्वांचा संबंध नसला तरी निवडणुकीच्या तोंडावर मने दुखावली जातात. निवडणुकीच्यावेळी आपण एकसंध आहोत, हे लोकांना दाखवावे लागते; पण अशा विधानांमुळे आपल्यातील वादाची मजा विरोधी पक्ष घेतील असे बोधामृत भुजबळांनी पाजले.

बदलापूर येथील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याची बाब उजेडात आली होती. त्याचे राज्यभर तीव्र पडसाद उमटले होते. या प्रकरणी सरकारला चौफेर टीका सहन करावी लागली. या घटनेचे वादळ शमते न शमते तोच मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळण्याची घटना घडली. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारची चांगलीच कोंडी झाली आहे. विशेषतः यामुळे सरकारने राबवलेल्या महत्त्वकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनाही झाकोळली गेली. महायुतीतील वादावादीमुळे सरकारची प्रतिमाही मोठ्या प्रमाणात मलिन होत आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांत एकमेकांना पाण्यात पाहण्याचा हा वाद उफाळून आला आहे. राज्यात विधानसभेची निवडणूक अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. असे असताना महायुतीत मिठाचा खडा पडला आहे. त्याअगोदर पुण्यातील भाजपच्या तीन पदाधिकाऱ्यांनी अजित पवार सोबत नको, अशी जाहीर भूमिका घेतली. वाद महायुती तुटण्यापर्यंत जात असल्याने शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी सावरून घेण्याचा प्रयत्न केला. आरोग्यमंत्र्यांना उलट्या येत असतील तर ते स्वतः आरोग्य मंत्री आहेत. त्यांनी त्याचे औषध घ्यावे. चुकीचे वक्तव्य करू नये. त्यांना जमत नसेल तर त्यांनी गप्प बसावे. याबाबत आम्ही मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, अशा शब्दांत गोगावले यांनी सावंत यांना घरचा आहेर दिला. अजित दादांची डोकेदुखी वाढली असल्याने तिसरी आघाडी अस्तित्वात येईल का याबाबत राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चा होत आहे.

---



# महिलांचे जाळे, आणि सामाजिक बांधिलकी जपत स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या यशस्वी महिला : शुभागी ताई

**पुणे/पिंपरी चिंचवड**
**बद्रीनारायण घुगे**

एका महिलेचा प्रवास म्हणजे तिची स्वतःची ओळख निर्माण करणे. इतरांसाठी तिचे काम म्हणजे प्रेरणा असणे. महिला सक्षमीकरण व महिला सबलीकरणाला हातभार लावणे. आत्मविश्वास आणि स्वाभिमान काय असतो याची जाणीव करून देणारी असते. एका सर्वसामान्य घरातील महिलेने कष्टाच्या जोरावर घेतलेली भरारी लक्षात घेण्यासारखी आहे. त्या महिला म्हणजे सौ.शुभांगी प्रकाश काळंगे. ( ताई)

आधुनिक युगातील हिरकणी ठरावी अशा शुभांगी ताईंचा हा प्रवास.

उराशी ज्ञानाची आशा बाळगणारी स्त्री काळाला व संकटांना कधीच घाबरत नसतें.

तिनं पाहिलं, सोसलं आणि सर्वांची मनं जिंकली ...

स्त्री म्हणून आपला प्रवास कृष्णामाईच्या काठी आणि रामदास स्वामींच्या वास्तव्याने पुणीत झालेल्या सुंदर आशा अंगापूर' या गावातून झाला . त्यांचा जन्म पेशाने शिक्षक असणाऱ्या श्री. गुलाबराव जाधव गुरुजी आणि आई मंगल यांच्या पोटी झाला. नोकरी मुळे प्राथमिक शिक्षण डोंगर कपारीत वसलेल्या, पंढरपूरच्या विठ्ठलावर नित्तांत प्रेम करणाऱ्या धनवडेवाडी या गावात झाले.

बालपण आपल्या सारखेच दोन भाऊ शिवाजी व भरत आणि एक बहीण राणी यांच्या सहवसात अक्का म्हणून गेले. आईने त्यांचे संगोपण आणि शिकवण मराठमोळी लेक म्हणूनच केली. त्यावेळी शिक्षण अंगापूर व सातारा येथे पूर्ण करून पुढील उद्धव चे शिक्षण कराड येथे पूर्ण केले.

. नंतर त्यांचा विवाह मेजर श्री. प्रकाश काळंगे यांच्याशी झाला.पती देश सेवेची नोकरी करत असल्याने त्या काळात संसाराची आणि सासरची जबाबदारी ताईंनी मोठ्या नेटाने पार पाडली. नंतर दोन अपत्ये झाली एक मुलगा व मुलगी.

परंतु काही संकटेही विधिलिखित असतात आणि ती आयुष्याची कसोटी पाहण्यासाठीच येत असतात. अशा काळात त्यांची मुलगी न्युमोनियाशी झुंज देताना देवाघरी गेली... काही काळ त्या मातृत्वाच्या आघाताने खूप खचुन गेल्या. परंतु त्याच काळात त्यांचे पती भक्कमपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले

आर्मीतून रिटायरमेंट झाल्यानंतर त्यांचे पती पोलीस म्हणून पुणे येथे रुजू झाले. संत तुकाराम महाराजांच्या देहू नगरीत वास्तव्यास आल्या नंतर श्री क्षेत्र देहू गावात आपल्या सामाजीक कार्यातून त्या पुढे येऊ लागल्या.

आक्रमणाचा इतिहास आणि भक्तिमार्गाचा मृदा असलेल्या देहूमध्ये राजमाता जिजाऊ साहेबांच्या प्रेरणेने सामाजिक बांधिलकी जपत एक सर्व सामान्य स्त्री देहूच्या शुभांगीताई म्हणून जनमाणसांपर्यंत पोहचल्या.

माजी सैनिकांची संघटने मध्ये साडे तीनशे कुटुंब एकत्र विविध उपक्रम राबविले. नारी शक्तीच्या माध्यमातून स्वतःचे स्थान त्या निर्माण केले ,

नारीशक्तीच्या माध्यमातून वाण नाही दान या संकल्पनेच्या माध्यमातून हळदीकुंकवाला गरजुंना गृह उपयोगी वस्तू धान्याचे किट महिलांचे मनोरंजनाचे कार्यक्रम घेण्यात आले, त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात महिला सगळ्या उत्साहाने भाग घेतात करोना काळात काम मन जिंकून घेणारं होतं त्यांचा हा ग्रुप अप्रतिम आहे नारी शक्ती ग्रुप च्या माध्यमातून त्या महिलांच्या साठी या धक्का धक्कीच्या जीवनात प्रेरणा देतात, ,अंगणवाडीतील छोट्या मुली, जिल्हा परिषद शाळा, संत जिजाबाई कन्या विद्यालय अशा शाळेतील मुलींना दत्तक घेणे, त्यांच्या शिक्षणाचा खर्च करणे. त्यांच्यासाठी व्याख्याने आयोजित करणे. प्रथम येणाऱ्या मुलींना बक्षीस आणि पुरस्कार देणे, गुणवंत विद्यार्थिनी पुरस्कार. अशा उपक्रमांच्या माध्यमातून मुलींना आणि शिक्षकांना प्रेरणा देण्याचे कार्य त्यांनी केले. त्याच्यासोबत समाजाचा विचार करणारी माणसं समाजाला दिशा देऊ शकतात हे त्यांच्या कार्यातून सहज लक्षात येते. जनजागृती सामाजिक मंचाच्या माध्यमातूनही अनेक उपक्रमात सहभाग घेतला. आदर्श शिक्षिका पुरस्कार आदर्श अंगणवाडी पुरस्कार सोहळ्यात त्यांनी भूमिका बजावलेली आहे. शिवसेनेच्या जिल्हा प्रमुख बनल्या आपल्या कामाच्या माध्यमातूनही त्यांनी सामाजिक कार्यात सहभाग नोंदवलेला . हे सर्व करत असताना त्यांनी स्वतःची मुलगी शिवनेरीच्या नावाने महिलांसाठी वस्त्र दालन सुरू केले आहे. व्यवसायाच्या माध्यमातून त्या देहू परिसरातील महिलांची सेवा करत आहेत. शिवनेरी आणि सूरज ही दोन्ही मुले शिक्षण घेऊन व्यवसायात हातभार लावत आहेत.

समाजाला दिशा देण्याचे आणि सर्व जाती धर्मातील लोकसाठी आपुलकी जिव्हाळा दाखवतात आणि मैत्री च्या दुनियेत आपल वेगळ असं स्थान निर्माण केल आहे ताई मैत्री साठी कायम तत्पर असतात ह्या गुणांची बरोबरी करणाऱ्या तुमच्या आमच्या सर्वांच्या शुभांगी ताईं . ३ सप्टेंबर हा त्यांचा वाढदिवस. वाढदिवसाच्या निमित्ताने ताईंचे सर्व संकल्प आनंद रूपाने साकार व्हावेत हीच मनोभावे सदिच्छा.

**सौ निशिगंधा खोल्लम**
**, सौ शीतल पवार**

---

# फ्लॅटच्या अमिषाने तब्बल ३० लाखांची फसवणूक

**सातारा :** सातार्यातील गुरुवार पेठेत इमारत बांधून त्यामध्ये दोन फ्लॅट देतो, असे सांगून सुमारे ३० लाख रुपये घेवून फसवणूक केल्याप्रकरणी अमर सतिश देशमुख (रा.सदरबझार, सातारा) या बिल्डर विरुध्द गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले असता ३ तारखेपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

पंकज भागवत मिसाळ (रा. संभाजीनगर, सातारा) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, फसवणूकीची घटना २०२१ साली घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तक्रारदार पंकज मिसाळ यांची अमर देशमुख याच्याशी व्यवसायाच्या निमित्ताने ओळख झाली होती. अमर देशमुख याने गुरुवार पेठेत इमारत बांधकाम परवानगी घेवून काम सुरु केले होते. मात्र २०२१ साली त्याला काही व्यावसायिकांची थकबाकी देणी झाली होती. ती देणी देण्यासाठी व प्रकल्प वेळेत पूर्ण करणेसाठी अमर देशमुख याने पंकज मिसाळ यांना भेटून 'सह्याद्री हाईटस' या प्रकल्पातील पहिल्या मजल्यामधील दोन फ्लॅट विकत घेण्याची विनंती केली. त्यानुसार ४० लाख रुपये रकमेचा व्यवहार दोघांमध्ये ठरला.

फ्लॅट घेण्यासाठी लागणारी व्यवहाराची रक्कम अमर देशमुख याने तक्रारदार मिसाळ यांना संबंधित रक्कम इमारत बांधण्यासाठी ज्या व्यवसायिकांकडून साहित्य घेतले होते, त्या व्यवसायिकांना पाठवण्यास सांगितले. त्यानुसार मिसाळ यांनी ७.५०.००० रुपये स्टील, ४ लाख रुपये सिमेंट, ११ लाख रुपये लेबर, सेट्रिंग, ३ लाख रुपये मुरूम सप्लायर्स, २ लाख ५० हजार रुपये स्टोन क्रशर १ लाख रुपये तसेच बोअरवेल व्यवसायिक यासह इतर व्यवसायिकांना रकमा पाठवल्या. याबाबतचे सर्व पुरावे तक्रारदार पंकज मिसाळ यांच्याकडे आहेत. अशाप्रकारे ४० लाख रुपयांपैकी ३० लाख रुपये दिले.

---

# तुळशीबागेत यंदा उज्जैनच्या महाकाल मंदिराची प्रतिकृती



पुणे : काळाचे चक्र फिरवणाऱ्या महाकालचे दर्शन साक्षात पुण्यामध्ये होणार आहे. यंदा तुळशीबागेतील श्री गजानन मित्र मंडळ ट्रस्ट गणेशोत्सवामध्ये मध्यप्रदेशमधील महाकाल मंदिर साकारणार आहेत. उज्जैनगरीचे राजा आणि शिवभक्तांचे दैवत असलेल्या महाकाल मंदिराची हुवेहब प्रतिकृती तुळशीबागेमध्ये पाहता येणार आहे. संपूर्ण १० दिवस सुविख्यात महाकाल श्रृंगार आणि विधिवत पूजा देखील केली जाणार आहे.

मंडळाच्यावतीने अध्यक्ष सागर सुनील दहीभाते तसेच सर्व पदाधिकारी यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. विश्रामबागवाडा समोरून तुळशीबागेत जाणाऱ्या गल्लीच्या प्रारंभीच ही भव्य प्रतिकृती उभी राहत असून सजावटीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

पारंपरिक गणेशोत्सवासाठी आणि समाजाभिमुख कामांसाठी श्री गजानन मित्र मंडळ ट्रस्ट ओळखले जाते. यंदा मंडळाचे ५९ वर्ष असून यानिमित्ताने भव्य गणेशोत्सव सोहळा साजरा केला जाणार आहे. तुळशीबागेमध्ये बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले महाकाल मंदिर आकार घेत आहे. मराठी चित्रपट सृष्टीत सेट तयार करण्याचा प्रदीर्घ अनुभव असणारे महेश कोरे यासाठी मेहनत घेत आहेत.

---

# वर्ल्ड हेरिटेज कासवर ५ सप्टेंबरपासून खुलणार फुलांची पहाट

## फुलोत्सोवासाठी समिती आणि वनविभाग सज्ज तयारी पूर्ण

**कास पठार :** जागतिक वारसा स्थळ असलेल्या वर्ल्ड हेरिटेज कास पुष्प पठारावरील फुलांची पर्वणी पर्यटकांसाठी ५ सप्टेंबर पासून खुली करण्यात येणार असून कास पठार कार्यकारी समिती आणि वनविभागा कडून यावर्षीच्या कास हंगामाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. कास पठराचा हंगाम दरवर्षी १ सप्टेंबर रोजी पर्यटकांसाठी खुला करण्यात येतो मात्र यावर्षीही १ सप्टेंबरपासून सुरू होणार होता परंतु पावसाने उघडीप न दिल्याने ४ दिवस हंगाम उशिरा सुरू करण्यात येत आहे. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता लोकसभेचे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले व सातारा जावलीचे कार्यसम्राट आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या उपस्थितीमध्ये यावर्षीच्या कास फुलोत्सवाचा शुभारंभ करण्यात येणार आहे यावेळी सातारा उपवनसंरक्षक यांचेसह सातारा व जावली च वनपरिक्षेत्र



अधिकारी व कास पठार कार्यकारी समितीचे सर्व सदस्य व कर्मचारी देखील उपस्थित राहणार आहेत. कास पठार कार्यकारी समितीकडून पर्यटकांसाठीच्या सर्व सोयी सुविधांची तयारी करण्यात आली असून यावर्षी प्रथमच पर्यटकांच्या करिता पाऊस आणि उन्हापासून संरक्षणासाठी नैसर्गिक रित्या सहा निवारा शेड तयार करण्यात आले आहेत .

कास हंगाम जरी पाच तारखेला अधिकृत खुला केला तरी दहा तारखे नंतर ऑनलाईन बुकिंग करणाऱ्या पर्यटकांना ऑनलाइन ची सुविधा ् .ज़्री.ळपव.ळप या वेबसाईटवर उपलब्ध असणार आहे. पर्यटकांसाठी प्रवेश शुल्क १५० रुपये, गाईड फी १०० रुपये (प्रति ग्रुप १० पर्यटक संख्या), उपद्रव शुल्क दोन हजार रुपये, बारा वर्षाखालील मुलांना मोफत



प्रवेश, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना ४० रुपये प्रवेश शुल्क मात्र सोमवार ते शुक्रवार येणे बंधनकारक असेल तसेच संबंधित शाळा कॉलेज महाविद्यालय यांच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांचे पत्र आवश्यक असेल. हंगामा करिता सहा गावातील १३० हंगामी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पार्किंग ते कास पुष्प पठार यादरम्यान पर्यटकांसाठी मोफत बस सेवा पुरविली जाणार आहे तसेच पार्किंगमध्ये सहा शौचालयांची व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे तसेच ठीक ठिकाणी पिण्यासाठी मिनरल वॉटरचे पाणी देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कास पुष्प पठारावर सद्यस्थितीमध्ये चवर,टोपली कारवी, दिपकांडी,आभाळी, सीतेची आसवे, सोनकी,तेरडा, भारांगी,धनगरी फेटा,तुतारी,कुमुदिनी यासह अनेक प्रकारची फुले उमलेली असून वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये नैसर्गिमध्ये ज्या प्रकारे बदल होतात त्याप्रमाणे इतर देखील फुले पर्यटकांना वेगवेगळ्या टप्प्यात पाहता येणार आहेत त्यामुळे यावर्षीच्या कासच्या फुलोत्सवाची परवणी आता पर्यटकांसाठी खुली होणार आहे. कास पुष्प पठारावर यावर्षी प्रथमच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वॉच ठेवण्यात येणार असून कास पठार कार्यकारी समितीचे कार्यालय तसेच राजमार्ग मुख्य प्रवेशद्वार ज्या ठिकाणी प्रवेश शुल्क घेतले जाते या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे हंगामापूर्वी बसविण्यात येणार आहेत.

### मद्यपान करणाऱ्यांवर देखील बसणार वचक

**कास पुष्प पठारावर सर्व स्तरातील पर्यटक हे फुले पाहण्यासाठी येत असतात काही पर्यटक हे पठारावर मद्यपान देखील करून येत असतात त्यामुळे अशा पर्यटकांवर वचक बसण्यासाठी समितीच्या माध्यमातून मद्यपान चेकिंग मशीन खरेदी करण्यात येणार असून कोणते पर्यटक पठारावर मद्यपान करून आलेले आहेत हे देखील आता समजणार आहे.**

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# वाढे फाटा परिसरात बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांचे आंदोलन



**सातारा :** वाढे फाटा तालुका सातारा येथे वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांच्या नाकाबंदी दरम्यान गाईंची वाहतूक करणाऱ्या ट्रक संदर्भात शंका आल्याने विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी तो ट्रक रोखला ट्रकमध्ये नऊ गाई व वासरे कोंबून भरण्यात आल्याने एका वासराचा मृत्यू झाला होता त्यामुळे आक्रमक झालेल्या कार्यकर्त्यांनी ट्रकची तोडफोड केल्याचे वृत्त आहे या प्रकारामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते

याबाबतचे अधिक माहिती अशी उत्तम नंदा डेअरी फार्म ही जालना जिल्ह्यामध्ये आहे तेथून अपशिंगे येथील शंकर डेअरी फार्म येथे नऊ गाई ट्रक मधून नेल्या जात होत्या सदर वाहनांमध्ये ही जनावरे कोंबून भरल्याने काही वासरे जखमी अवस्थेत आढळून आली तर एका वासराचा मृत्यू झाला होता सदर वासरे व गाई ही कत्तलीसाठी नेली जात असल्याचा आरोप विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे अजित सिंह भोसले विक्रम विभुते सोहम खुस्पे राहुल राठोड सुरज माने यांनी करत हा ट्रक रोखून धरला

यावेळी ट्रक चालक व विश्व हिंदू परिषद कार्यकर्त्यांच्या आंदोलकांची जोरदार बाचाबाची झाली कार्यकर्त्यांनी ट्रकच्या काचेची तोडफोड केली घटनेचे वृत्त कळतात सातारा पोलीस हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले .पोलिसांनी मध्यस्थी करून कार्यकर्त्यांनी शांत केले पोलीस बंदोबस्तामध्ये अपशिंगे येथे हा ट्रक रवाना करण्यात आला घटनास्थळी बघ्यांची प्रचंड गर्दी झाली होती.

# माणची दहशत मोडण्यासाठी हजारो कार्यकर्त्यासह दहिवडीत येणार : अभयसिंह जगताप

**दहिवडी :** आ. जयकुमार गोरेंच्या कार्यकर्त्यांकडून महिलांच्या गौरी गणपतीच्या कार्यक्रमाचे बॅनर फाडून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे

ही दहशत मोडीत काढणे गरजेचे आहे त्यासाठी मंगळवारी हजारोच्या संख्येने सर्व पक्षीय संघटनांचे कार्यकर्ते दहिवडीत येऊन मोर्चाचे निवेदन देणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अभय जगताप यांनी आज दहिवडी येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिली.

बोराटवाडी येथे अभय जगताप यांनी लावलेला बॅनर काही जणांनी फाडला. त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अभय जगताप यांनी दहिवडी तेथे पत्रकार परिषद घेऊन निषेध नोंदवला. पुढे बोलताना म्हणाले की माण तालुका दहशतीच्या वातावरणात आहे तालुक्यातून लोकशाही अक्षरशः संपले की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. बोराटवाडी या गावात महिलांच्या होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे नियोजन असलेले बॅनर लावण्यात आले होते. बॅनर आमदारांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगून बॅनर फाडलं असा आरोप अभय जगताप यांनी केला.पुढे म्हणाले की सुरुवातीला बॅनर कदाचित वाऱ्याने पडला असेल फाटला असेल वाटले म्हणून आम्ही शांतता बाळगली.पण बॅनर बऱ्याच ठिकाणी तुकडे करून टाकण्यात आले होते. त्यावरून ते स्पष्टपणे दिसत होते.त्याच ठिकाणी आमदारांचे बॅनर उभा केले गेले हा जो प्रकार आहे तो सर्वसाधारणपणे विरोधी पक्षातील लोकांना त्यांचा प्रचारच करता येऊ नये आणि एक प्रकारची दहशत माजवण्याचा हा प्रकार आहे. तालुक्यामध्ये लोकशाही अस्तित्वात आहे की नाही ही परिस्थिती निर्माण झाली आहे खरं सांगायचं झालं तर ठोशास ठोसा देण्याची आमची प्रवृत्ती आहे त्यामुळे आम्हीही आमच्या कार्यकर्त्यांनी जर कायदा हातात घेतला तर त्याचं नवल वाटू नये कारण एका बाजूला कायदा हातात घेणाऱ्या आमदारांना आणि त्याच्या कार्यकर्त्यांना प्रशासन संरक्षण देते की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन पोलीस असू द्या किंवा महसूल प्रशासन असू द्या. यांनी ज्या पद्धतीने आमदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या वर कारवाया करायला पाहिजे त्या पद्धतीने होताना दिसत नाहीत असा आरोप अभय जगताप यांनी प्रशासनावर केला.

बॅनरची एक छोटी घटना आहे याची आम्ही अजून तक्रारी दिलेली नाही. मंगळवारी आम्ही त्याविषयी तक्रार देणार आहे.परंतु फक्त बॅनरचा विषय नाहीये तर माण तालुक्यामध्ये विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून धमकी दिली जाते.अनेक ग्रुप वर आमदारांच्या विरोधात बोलणाऱ्या वर दमदाटी केली जाते. दमदाटीची भाषा केली जाते त्यांना फोन करून दम दिला जातो अशा दहशतीच्या वातावरणात तालुका राहतोय त्या माण खटावला दहशतमुक्त करण्याची जबाबदारी आता इथल्या सर्वपक्षीय नेत्यांनी आणि इथल्या जनतेने घेण्याची गरज आहे आणि त्यासाठीच मी आता सर्वांना आव्हान करतोय की येणाऱ्या मंगळवारी निवेदन देण्यासाठी सिद्धनाथ मंदिरापासून दहिवडी पोलीस स्टेशन आणि दहिवडी तहसील कार्यालय येथे चालत येऊन निवेदन देण्याचे नियोजन केलेले आहे आणि यामध्ये सर्व माण तालुक्यातील दहशतीच्या वातावरणात जगण्याची इच्छा नसणाऱ्या माण तालुक्याचा बिहार होऊन द्यायचा नाही अशी इच्छा असणाऱ्या सर्व सामाजिक

# वाई - खंडाळा - महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाच्यावतीने भव्य महाशिबिर

**वाई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार वाई - खंडाळा - महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाच्यावतीने, डॉ. नितीन सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी सहकार मंत्री व विद्यमान आमदार बाळासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वसामान्यांच्या जनसेवेसाठी रत्नोदय मंगल कार्यालय, सुरूर (वहागांव फाटा) ता. वाई येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य महा शिबिरास उपस्थित होतो.

या महाशिबिरामध्ये हृदयरोग व आरोग्य तपासणी शिबिर पार पडले, यामध्ये मोफत ईसीजी तपासणी, मोफत ब्लड प्रेशर मोफत शुगर तपासणी करण्यात आली, विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, रक्षाबंधन निमित्त महिला भगिनींसाठी स्वयंरोजगाराची भेट म्हणून मुली व महिलांसाठी मोफत एक दिवसाच्या रोजगार प्रशिक्षण देण्यात आले.

सरकारने लाडकी बहीण योजेनेबरोबर अनेक योजना जाहीर केल्या आहेत, या योजना कोणत्या एका पक्षच्या नसून जनतेच्या योजना आहेत, त्या योजनांचा लाभ सर्वांनी घ्यावा, आपल्या सर्वांच्या कर रूपातून गेलेल्या पैशातून या योजना सुरू आहेत.

सत्ताधारी पक्षातील काही आमदार महोदयांकडून विधानसभेला आम्हाला सहकार्य करा, अन्यथा विधानसभेनंतर पैसे परत घेऊ असा धमकी वजा इशारा दिला जातोय, अशा धमक्यांना महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनता भीक घालणार नाही, अशा धमक्यांना कोणीही घाबरू नका असे आवाहन यावेळी केले. याप्रसंगी वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष डॉ. नितीन सावंत, व डॉ. सतीश बाबर, माजी नगरसेवक कैलास जमदाडे, युवक अध्यक्ष केदार गायकवाड, सुधाकर गायकवाड, संतोष पवार, संग्राम कदम, संतोष शिंदे, जावेदखान मोकाशी, के. के. गायकवाड, उत्तमराव सावंत, शंकरराव गायकवाड तसेच महिला व नागरिक उपस्थित होते.

# माजी मंत्री महादेवराव जानकर यांना उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार जाहीर



**वडूज :** राज्याचे माजी पशु संवर्धन व दुग्धविकास मंत्री महादेवराव जानकर,यांची राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२२-२३ करिता महाराष्ट्र विधानपरिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाचे पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांना सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२. २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण या पुरस्कारांसंदर्भात पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम मंगळवार, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे.

# कडेगांव येथे माण-खटाव तालुक्यातील काँग्रेसचे हजारो कार्यकर्ते जाणार

### वडूज येथील बैठकीत पदाधिकाऱ्यांचा एल्गार



**वडूज :** कडेगांव जिल्हा सांगली येथील डॉ .पतंगराव कदम यांच्या पुर्णाकृती पुतळा व स्मारक अनावरण लोकार्पण सोहळ्यास विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी व खा. शरदचंद्रजी पवार यांच्या उपस्थितीत सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्याला माण - खटाव तालुक्यातील हजारो काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याची माहिती वडूज येथील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत देण्यात आली.

येथील फिनीक्स आर्गनायझेशन सभागृहात माण- खटाव तालुक्यातील काँग्रेस पदाधिकारी बैठक पार पडली.यावेळी आखिल भारतीय काँग्रेसचे सदस्य रणजितसिंह देशमुख,माण विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष डॉ.महेश गुरव, माण तालुक्याध्यक्ष बाबासाहेब माने, खटाव तालुक्याध्यक्ष डॉ. संतोष गोडसे, प्रदेश प्रतिनिधी राजूभाई मुलाणी, उपसभापती विजयकुमार शिंदे,युवकचे जिल्हाध्यक्ष अमरजित कांबळे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना रणजितसिंह देशमुख म्हणाले की, डॉ .पतंगराव कदम यांच्या कडेगांव येथील लोकतीर्थ पुर्णाकृती पुतळा व स्मारक अनावरण लोकार्पण सोहळ्यास लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी, प्रमुख पाहुणे शरदचंद्रजी पवार, आखिल भारतीय काँग्रेस कमिटी अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे आदिंसह काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. काँग्रेस पक्षाचे विचार ऐकण्यासाठी माण- खटाव तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी कार्यक्रमाच्या नियोजन संदर्भात योग्य त्या सुचनाही यावेळी देशमुख यांनी केल्या. गुरूवार दि.५ रोजी सकाळी अकरा वाजता कडेगांव येथील कार्यक्रमाचे नियोजन केले असून दोन्ही तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माण - खटाव तालुक्यातील काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.याप्रसंगी खटाव - माण तालुक्यातील राष्ट्रीय काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपघातात एकाच्या मृत्यू प्रकरणी ट्रक चालकावर गुन्हा

**सातारा :** अपघातात एकाचा मृत्यू आणि दोन जण जखमी झाल्या प्रकरणी अज्ञात ट्रक चालकावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ३० रोजी राष्ट्रीय महामार्गावर सेंद्रिय गावच्या हद्दीत अशोक लेलँड ट्रक क्र. युके ०६ सीबी ७०६१ वरील अज्ञात चालकाने ट्रक रस्त्यावर धोकादायक स्थितीत उभा केल्याने किरण गणपत वायदंडे रा. भिवडी, पोस्ट त्रिपुटी, ता. कोरेगाव हे चालवीत असलेल्या कारची ट्रकला पाठीमागून जोरदार धडक बसली. या अपघातात किरण वायदंडे यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या पत्नी आणि मुलगा जखमी झाले आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक देशमाने करीत आहेत.

# प्रसिद्ध चित्रकार सतिश गायकवाड यांच्या कलाकृतींचे मुंबई येथील जहांगीर आर्ट गॅलरीत भव्य प्रदर्शन

**कोरेगाव :** आर्वी ता. ता.कोरेगाव गावचे चित्रकार सतिश गायकवाड यांच्या कुंचल्यातून साकारलेल्या निसर्ग सौंदर्याची अप्रतिम लयलूट व सांगीतिक अनुभूती देणाऱ्या चित्र कलाकृतींचे 'सृजनसृष्टी' या नावाने चित्रप्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई येथे सोमवार दि. २ सप्टेंबर ते रविवार दि. ८ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत रसिक प्रेक्षकांसाठी खुले आहे.

'सृजनसृष्टी' या चित्रप्रदर्शनाच्या निमित्ताने निसर्गातील विविध छटांचा अनुभव हुबेहूब देण्याचा व सांगीतिक ऊर्जेची अनुभुती देणाऱ्या कलाकृतींचा त्यांचा प्रयत्न निश्चितच सुखावह आहे. त्यांच्या या कलाप्रवासामध्ये सुरुवातीलाच विद्यार्थीदशेत असताना कलाशिक्षक टी. आर. पाटील यांनी त्यांचा विद्यार्थी सतिशच्या सुप्त कलागुणांना ओळखून चिमुकल्या हातात कुंचला देऊन त्याच्यातील उर्मी जागृत केली. कौंटुबिक कोणत्याही प्रकारचा कलेचा वारसा नसताना आई सत्यभामा व वडील रामचंद्र गायकवाड यांच्या प्रोत्साहनामुळे व पाटील सरांच्या मार्गदर्शनामुळे कलाक्षेत्रातील एका व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत मोलाचे मार्गदर्शन लाभले व त्यांच्या आयुष्याला योग्य कलाटणी मिळाली.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी ए.टी.डी. चे शिक्षण जे. एम.भंडारी स्कूल ऑफ आर्ट, बेळगाव येथे पूर्ण केले. जी. डी.आर्ट ची पदवी घेत असताना कलाविश्व महाविद्यालय, सांगलीचे प्राचार्य.एम् के.जाधव, माजगावकर, पंडित, मोगलान श्रावस्ती, बाळासाहेब पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे व्यक्तिचित्र,रचना चित्र तसेच निसर्गचित्र यामध्ये त्यांना प्राविण्य प्राप्त झाले.

यानंतर डीप.ए. एड.ची पदवी अभिनव कला महाविद्यालय, पुणे येथून घेताना पेंटींग व प्रिंट याबाबतचा सखोल अभ्यास केला. तसेच ओरिसा राज्यातील ललित कला अँकॅडमी, भुवनेश्वर येथे लिथोग्राफी व ईचींग याबाबतचा सखोल अभ्यास केला.

कराड उत्तरचे तत्कालीन आमदार स्व.पी.डी.पाटील यांनी सतिश च्या कलाकृतीने प्रभावित होऊन त्यांला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. तसेच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी निमित्त दरमहा एक याप्रमाणे यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनातील अनेक पैलूंचे दर्शन घडवणाऱ्या १२ व्यक्तिचित्रांचे प्रदर्शन १२ मार्च रोजी वेणुताई चव्हाण स्मारक कराड येथे केले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सवी सोहळ्यामध्ये ब्लू रिफ्लेक्शन ग्रुप, मुंबई येथे चित्रप्रदर्शन केले. त्यांनी महाराष्ट्रातील विविध राज्यस्तरीय चित्र प्रदर्शनामध्ये सहभाग घेऊन आपली कला सादर केली. त्यांनी शिवाजी शिक्षण संस्था कराडच्या श्री शिवाजी विद्यालय कराड, श्री शिवाजी विद्यालय कार्वे येथे कलाशिक्षक म्हणून काम केले.

# जगप्रसिध्द सातारा हिल मॅरेथॉनचा खा. उदयनराजेंच्या हस्ते शानदार शुभारंभ





**सातारा :** सातारा हिल मॅरेथॉन ही डोंगरावर होणारी संपूर्ण जगातील वैशिष्ट्यपूर्ण मॅरेथॉन आहे. साधारण १३ वर्षापूर्वी पाहिलेले स्वप्न या मॅरेथॉनच्या निमित्ताने दरवर्षी साकारत आहे, याचा आनंद वाटतोय, असे प्रतिपादन खा. श्री.छ. उदयनराजे भोसले यांनी केले आहे.

सातारा रनर्स फाउंडेशन तर्फे आयोजित सलग तेराव्या वर्षाच्या सातारा हाफ हिल मॅरेथॉन स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी पोलीस परेड ग्राउंड वर ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख, बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे,जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, संयोजन समितीच्या अध्यक्षा डॉ.आदिती घोरपडे, ड.कमलेश पिसाळ,डॉ. चंद्रशेखर घोरपडे, डॉ. संदीप काटे यांच्यासह सातारा रनर्स फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी व देशभरातून आलेल्या धावपटूंची उपस्थिती होती.

यावेळी उदयनराजे म्हणाले की, कास हे पूर्वीपासूनचे माझे आवडते ठिकाण आहे. मी नेहमीच घाटाई मंदिर, कास परिसरात जातो. एकदा डॉ. चंद्रशेखर घोरपडे यांच्या समवेत त्या मार्गावरून जात असताना सातारकरांच्या आरोग्य संवर्धनासाठी आणि त्यांना व्यायामाची आवड लागावी यासाठी काहीतरी ठोस उपक्रम घेऊया, अशी चर्चा झाली आणि त्यातूनच सातारा हाफ हिल मॅरेथॉनचा जन्म झाला. निरोगी शरीर हीच प्रत्येकाची खरी संपदा असते आणि ते तंदुरुस्त ठेवण्यासाठी व्यायाम महत्त्वाचा ठरतो. सातारा हाफ हील मॅरेथॉनच्या निमित्ताने अनेकांना व्यायामाची आणि धावण्याची सवय लागली, तसेच या स्पर्धेत स्थानिक आणि राज्यभरातून, देशभरातून इतकेच काय परदेशातूनही धावपटू येतात हे या स्पर्धेचे अनोखे यश आहे.

भविष्यात ही मॅरेथॉन संपूर्ण जगभरात नावलौकिक कमवेल, असा मला विश्वास आहे. धावपटूंना मॅरेथॉनमुळे जशी ऊर्जा मिळते तसेच अशा उपक्रमामुळे संपूर्ण समाजाला गती आणि ऊर्जा मिळते. रनर्स फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी तसेच सातारकर नागरिक, प्रायोजक या सर्वांच्या अथक परिश्रमातून होत असलेल्या सातारा मॅरेथॉनचे नाव जगभर व्हावे, अशा सदिच्छा यावेळी उदयनराजेंनी व्यक्त केल्या.

पुरुषांमध्ये कोल्हापूरचा उत्तम पाटील तर महिलांमध्ये भंडाऱ्याच्या तेजस्विनी लांबकाने यांनी पटकावला प्रथम क्रमांक

सातारा रनर्स फाउंडेशनच्या वतीने काल सातारा येथे झालेल्या जेबीजी सातारा हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धेत कोल्हापूरच्या उत्तम पाटील वय २४ याने ही स्पर्धा १.१३.३२ सेकंदात पूर्ण करून पुरुषांमध्ये पहिला क्रमांक पटकावला. तर भंडाऱ्याच्या कु तेजस्विनी लांबकाने यांनी हे अंतर १.२६.१८ सेकंदामध्ये स्पर्धा पूर्ण करत महिलांमध्ये पहिला क्रमांक पटकावला.

सातारा रनर्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित जाणाऱ्या स्पर्धेचे हे १३ वर्ष आहे. या मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात पोलिस परेड ग्राउंड येथून सकाळी ६.३० वाजता खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री समीर शेख यांनी स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवला. सुमारे ७५०० हून अधिक स्पर्धकांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवला.

बेळगावच्या अनंत गावकर यांनी हे अंतर १.१३.४१ सेकंदात पूर्ण करत पुरुषांमध्ये दुसरा क्रमांक पटकावला.

ओपन (पुरुष)

अनंत गावकर (दुसरा) १.१३.४१ सेकंद (बेळगावी), प्रथमेश परमकार (तिसरा) १.१३.५० सेकंद

ओपन (महिला),

तेजस्विनी लांबकाने (पहिली) १.२६.१८ सेकंद (भंडारा) साक्षी जडयाल (दुसरी) १.३१.२६ सेकंद (चिपळूण) वैष्णवी मोरे (तिसरी) १.३१.४० सेकंद (कराड)

वयोगट ३० ते ३४

(महिला) सोनाली देसाई (प्रथम) मनीषा जोशी (द्वितीय) चद्रशमिता हजारीका (तृतीय)

पुरुष - वयोगट ३० ते ३४

अनंत गावकर (प्रथम) प्रल्हाद धनवत (द्वितीय) विशाल कामबीरे (तृतीय)

वयोगट ३५ ते ३९

(महिला) ज्योती ठाकरे (प्रथम) अर्पिता पंड्या (द्वितीय) नेत्रा पेलापकर (तृतीय) पुरुष - शशी दिवाकर (प्रथम) किशन कोशारिया (द्वितीय) विक्रम मिना (तृतीय)

वयोगट ४० ते ४४ (महिला)

आयेशा मानसुखानी (प्रथम) रीना (द्वितीय) आरती झंवर (तृतीय)

पुरुष -

परशुराम भोई (प्रथम) मल्लिकार्जुन पराडे (द्वितीय) राजेश कोचे (तृतीय

# शिवछत्रपती पुतळा कोसळल्या निषेधार्थ पाटण येथे जोडे मारो आंदोलन

**पाटण :** मालवण येथील राजकोट किल्ल्यावर आपल्या सर्वांची अस्मिता असणारे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. हा शिवरायांचा पुतळा नव्हे तर महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळला असून याला जबाबदार दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी. आजपर्यंत सार्वजनिक व शासकीय, प्रशासकीय कामात टक्केवारी खाणाऱ्या आजच्या राज्यकर्त्यांनी भ्रष्टाचारी मानसिकतेतून छत्रपतींचा पुतळाही सोडलेला नाही. हे भ्रष्टाचारी शासन, राज्यकर्त्यांना उलथवून टाकण्याशिवाय आता पर्यायच नाही. राज्यासह पाटण विधानसभा मतदारसंघातही असलेली टक्केवारी, कमीशनची मलिदा गँग आता उध्वस्त करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांनी पाटण येथे मालवण राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीसह अन्य पक्ष, संघटनांच्या वतीने जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना सत्यजितसिंह पाटणकर पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे आपली अस्मिता, आराध्य दैवत, विचार, संस्कार आणि आदर्शांचे प्रतीक आहेत. मालवण येथील छत्रपतींचा पूर्णाकृती पुतळा कोसळण्याचे दुर्भाग्य आपल्या महाराष्ट्रात घडते यासारखी निंदनीय बाब नाही. काँग्रेसने काय केले असे विचारणाऱ्या सत्ताधारी राजकारण्यांनी काँग्रेसच्या काळात उभारलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्यातच नव्हे तर देशभरातील पुतळे आजही अतिशय चांगल्या अवस्थेत पाहायला मिळताहेत हे एकदा जाऊन तपासून पहावे. दुर्दैवाने आपले राज्यकर्ते दस्तूरखुद्द मुख्यमंत्रीच शिवरायांचा पुतळा वाऱ्याने पडल्याचे घृणास्पद वक्तव्य करतात. ज्या वाऱ्याने त्या विभागातील नारळाच्या झाडावरील नारळ पडला नाही मात्र तिथे छत्रपतींचा पुतळा वाऱ्यामुळे पडला असे विधान करून मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राची प्रतिमा व अस्मिता धुळीला मिळवली आहे.

आजच्या राज्यकर्त्यांनी रस्ते, पाणी, वीज, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्र, समाज मंदिरे आदी सर्वच ठिकाणी कमिशन, टक्केवारीतून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला आहेच. एवढ्यावरच न थांबता यांनी थेट छत्रपतींच्या पुतळ्यालाही टक्केवारीचा हात घातल्याने अवघ्या आठ महिन्यातच हा पुतळा कोसळला यासारखी लांछनास्पद बाब नाही. एका बाजूला राज्यात अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात कमिशन, भ्रष्टाचार, टक्केवारी बोकाळली असताना त्याच पद्धतीची मलिदा




**मालवण येथे शिवछत्रपतींचा पुतळा कोसळण्याच्या निषेधार्थ पाटण येथे आंदोलनात बोलताना सत्यजितसिंह पाटणकर. भ्रष्टाचारी सरकारच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारताना सत्यजितसिंह पाटणकर पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थिनी.**

गँग पाटण विधानसभा मतदारसंघातही सक्रिय आहे. मागील काही वर्षात याच मलीदा गँगकडून सार्वजनिक व्यवस्था उध्वस्त झाली असून यातून सार्वजनिक विकास कामांचे वाट्टोळे झाले आहे. आपल्याच घामाच्या कराच्या पैशाच्या माध्यमातून ही मलिदा गँग टक्केवारी, कमिशनमधून आपल्यालाच उध्वस्त करत असल्याने येणाऱ्या निवडणुकीत यांना हद्दपार करणे ही आता प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. ही टक्केवारी, कमीशन नक्की कुणाच्या घशात व कोणाच्या खिशात जाते हे वेगळं सांगण्याची गरज नाही. इतरवेळी किरकोळ बाबीतही समोर येऊन बोलणारे नेते छत्रपतींचा पुतळा कोसळल्यानंतर मूग गिळून गप्प का? यावरूनच यांच्या भ्रष्टाचार मानसिकतेची प्रचिती येते. याशिवाय मालवण पुतळा दुर्घटनेची चौकशी येत्या दहा दिवसातच होऊन संबंधितांवर कठोरात कठोर कारवाई व्हावी नाहीतर वेळकाढूपणा करणारे राज्यकर्ते स्वतःच अशा घटनांना जबाबदार असल्याने याबाबत कोणत्याही करावया करणार नाही अशीही भीती सर्वसामान्य जनतेला वाटते. मात्र यांनी आता काहीही करू द्या येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अशा भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांना जनता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असेही शेवटी सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले.

यावेळी राज्यकर्त्यांच्या निषेधार्थ बनवलेल्या प्रतिकात्मक पुतळ्याला मान्यवर नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोडे मारत भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांचा जाहीर निषेध केला. शिवछत्रपतींचा पुतळा कोसळल्या प्रकरणी संबंधितांवर कठोरात कठोर कारवाई व्हावी व या घटनेचा तीव्र निषेध केल्याचे निवेदन सत्यजितसिंह पाटणकर व उपस्थित मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशासनाला देण्यात आले.

### कमिशन टक्केवारीसाठी शिवरायांच्या पुतळ्याचे घाट घालू नका

**कमिशन, टक्केवारीच्या अपप्रवृत्तीमुळेच मालवण येथे शिवछत्रपतींचा पुतळा कोसळला. पाटण तालुक्यातही शिवरायांचा पुतळा उभा करण्याचा प्रयत्न होत आहे, शिवरायांचा पुतळा उभारणीसाठी आम्हा सर्वांचा निश्चितच पाठिंबा असेल. मात्र दुर्दैवाने यात कमिशन, टक्केवारी, निकृष्ट दर्जाचे काम अथवा गलथानपणा झाला तर मात्र संबंधितांना सोडणार नाही असा इशाराही मान्यवरांनी या निषेध मोर्चावेळी दिला.**

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पाटण विधानसभा मतदार संघ अध्यक्ष राजाभाऊ शेलार , सरचिटणीस सुभाषराव पवार, संजय इंगवले, दयानंद शिलवंत, शंकर शेडगे, मनोहर यादव, बकाजीराव निकम, श्रीमती पुष्पाताई जाधव, सचिन जाधव, विश्वजीत पाटणकर, विशाल निकम, बबनराव कांबळे , प्रकाश घाडगे आदी अनेक मान्यवरांनी निषेधार्थ विचार व्यक्त केले.

यावेळी पाटण अर्बन बँक चेअरमन बाळासाहेब राजे महाडिक, खरेदी विक्री संघ चेअरमन ॲड. अविनाश जानुगडे, युवा उद्योजक अर्जुनसिंह पाटणकर, मनसेचे तालुकाध्यक्ष गोरख नारकर, दिनकरराव घाडगे, अभिजीत जाधव, माजी पंचायत समिती सभापती सौ. सुनंदा गुरव, गुरुदेव शेडगे महाविकास आघाडीसह अन्य पक्ष संघटना, संभाजी ब्रिगेड आदींचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, महिला विद्यार्थी, विद्यार्थिनी व तरुण-तरुणी बहुसंख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन शंकर शेडगे यांनी केले.

# माजी कॅप्टनचे आझाद मैदानात उपोषण

**मुंबई :** दिव्यांग आर्मी ऑफिसर कॅप्टन अनंत निकम मु पो कुळवंडी तालूक खेड जि रत्नागिरी यांना कॅप्टन पदाचे ओळखपत्र देणे व कॅप्टन पदाचे पी पी ओ आदेश देवून इतर लाभ जिल्हा सैनिक बोर्ड रत्नागिरी यांनी देणे बाबतचे आदेश मुंबई उच्च न्यायालय यांनी ३ फेब्रुवारी २००९ रोजी आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने कॅप्टन अनंत निकम यांना ५८,९३.४५३ रुपये १० पैसे तसेच १८ टक्के व्याज देणे मागणी केलेल्या कायद्यानुसार बंधनकारक आहे. तरीही न्याय मिळत नाही म्हणून त्यांनी आझाद मैदानात उपोषण सुरू केले आहे.

तसेच राष्ट्रपती, राज्यपाल, मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, मुंबई उच्च न्यायालय, सत्र न्यायालय रत्नागिरी खेड, कनिष्ठ न्यायालय खेड रत्नागिरी, मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, राज्य माहिती आयोग मुंबई, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मंत्री रामदास कदम या सर्वांचे आदेश निर्देश असून सार्वजनिक प्रशासन विभाग २८ अवर सचिव उर्मिला सावंत यांच्याकडून अती तात्काळ खास बाब म्हणून भारतीय संविधान कलम ३०० क, कलम १६३ ( २ ) व कलम १६६ ( १ ) ( २ ) , कलम २१ जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण येणे प्रमाणे आहे असे माजी कॅप्टन अनंत निकम यांनी सांगितले.

# 'कोल्हापूर उत्तर'मध्ये सर्वच पक्ष चेहऱ्याच्या शोधात

**कोल्हापूर :** कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी आणि महायुती यांच्याकडे उमेदवार नेमका कोण याचे उत्तर आजमितीस खात्रीशीरपणे कोणाकडेही नाही. हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाकडे असला तरी विद्यामान आमदारांना पुन्हा मतदारसंघात उतरवले जाणार का, याबाबत पक्षातूनच साशंकता व्यक्त केली जात आहे. महायुतीकडे भाजप आणि शिवसेना शिंदे गटाकडे अनेक दावेदार असल्याने उमेदवारीची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात याचेही अचूक उत्तर मिळत नाही. जिल्ह्यातील अन्य मतदारसंघात सत्तारूढ वा विरोधक यांपैकी कोणाची तरी उमेदवारी निश्चित मानली जात असताना त्याला अपवाद बिनचेहऱ्याचा कोल्हापूर उत्तर मतदारसंघ राहिला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात दीर्घकाळ काँग्रेस-राष्ट्रवादीचे राजकीय वर्चस्व राहिले आहे. कोल्हापूर शहर त्याला अपवाद बनले आहे. चार दशकांचा इतिहास पाहता येथे पाच वेळा शिवसेनेची सरशी झाली आहे. काँग्रेसने तीन वेळा बाजी मारली आहे. गेल्या निवडणुकीत भाजपातून काँग्रेसमध्ये आलेले चंद्रकांत जाधव यांनी शिवसेनेकडून दोन वेळा निवडून आलेले राजेश क्षीरसागर यांचा पराभव केला. करोना संसर्ग काळामध्ये त्यांचे निधन झाले.

पोटनिवडणुकीमध्ये त्यांच्या पत्नी जयश्री जाधव यांनी या मतदारसंघात २०१४ साली काँग्रेसकडून लढलेले पण भाजपकडून उतरलेले सत्यजित कदम यांचा पराभव केला. जयश्री जाधव यांनी अडीच वर्षाच्या कालावधीत मतदारसंघाचा किल्ला चांगलाच लढवला आहे. पण पुन्हा त्यांना उमेदवारी मिळणार का, याबद्दल तर्कवितर्क आहेत. यावेळी महायुतीकडून या मतदारसंघात कडवे आव्हान मिळणार असल्याने काँग्रेसच्या वरिष्ठ पातळीवरून ताकदीचा उमेदवार देण्याच्या हालचाली सुरू आहेत. तूर्तास, काही मधल्या फळीतील कार्यकर्त्यांची नावे पुढे येत आहेत.

या मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आमदार मालोजीराजे छत्रपती, त्यांच्या पत्नी मधुरीमाराजे छत्रपती यांच्या नावाची चर्चा होती. पण लोकसभेत काँग्रेसकडून शाहू छत्रपती विजयी झाले. त्यामुळे खासदारकीपाठोपाठ आमदारकी छत्रपती घराण्याकडे जाण्याबद्दल प्रश्नचिन्ह लावले जात आहे. त्यामुळे या मतदारसंघात काँग्रेस उमेदवार बदलण्याच्या मन:स्थितीत असली तरी सक्षम उमेदवार कोण याचे उत्तर मात्र मिळत नाही.

# दौंडची जागा राष्ट्रवादीला देण्यात यावी मागणीस जोरदार पाठिंबा

### दौंड भाजपमध्ये अस्वस्थता

**दौंड :** विधान सभा निवडणुका घोषित होण्याची वेळ अतीशय समिट आली असताना दौंड विधानसभा जागा राष्ट्रवादी अजित पवार गटास देण्यात यावी. या बाबा जगदाळे यांनी केलेल्या मागणीस दौंड शहरआणी तालुक्यातुन जोरदार स्वागत करण्यात येवुन यास प्रचंड पाठिंबा मिळत आहे.

राज्यात शिंदे शिवसेना, भाजप आणी राष्ट्रवादी अजितदादा पवार अशा युतीची सत्ता आहे.

दौंड मध्ये भाजपचा आमदार आहे. शिवाय दौंड भाजपचे आमदार राहुल कुल हे युती सरकारच सर्वो सर्वा देवेंद्र फडणविस यांचे अती धनिकटचे , आणि. गळ्यातील ताईत मानले जात आहेत. ज्या पक्षाचा आमदार जेथे असेल तेथे त्या पक्षाचा उमेदवार देणार. असे धोरण स्पष्ट असताना दौंड ची जागा राष्ट्रवादीला मागणे. या बाबत चर्चेला उधाण आलं आहे. विशेषत ही मागणी दौंड मधील एक वजनदार नेते आणखी अजित पवार यांचे गळ्यातील. ताईत असलेलं बाबा जगदाळे यांनी ही मागणी केल्याने तालुक्यासह जिल्ह्यात चर्चेला जोर वाढला आहे.

जगदाळे यांची मागणी रितसर, रास्त आणि योग्य असल्याने या मागणीला पाठिंबा मिळत आहे.दौंड मध्ये राष्ट्रवादी अ. प. गट भक्कम असुन आमदार सहज निवडुंग येणार. हा जगदाळे यांचा दावा आहे.

असे असले तरी दोन नेत्यांच्या निष्ठावंत यांचेसाठी कोण बाजु लावुन धरेल . कोण उमेदवारी सर्व ते भगिरथ प्रयत्न करुन खेचून आणेल. यावर सर्व अवलंबुन आहे.या मागणीने दौंड मधै भाजप आणखी अजित पवार गट याचेच गैरसमज आणखी कटुता निर्माण करणारा आहे.

स्वतःला राज्याचे दबदबा असलेले आणखी राष्ट्रवादी चे सर्वोच्च नेते अंजीर पवार यासाठी नेमके काय भुमिका घेतात की भाजपचे राज्यातील सर्व सर्वा देवेंद्र फडणवीस यांची नाराजी नको म्हणून विषय सोडून देवुन बाबांनाच गप्प बसवतात. हे लवकरच पहावयास हमखास मिळेल. बाबा जगदाळे यांची मागणी रितसर आहे. बाबा हे अंजीर पवार यांचा शब्द स्वप्नातही डावलु शकत नाहीत. बाबांनी मागणी लावून धरावीच. एकदा आर किंवा पार .हा निर्णय घ्यावा असा रेटा कार्यकर्ते करु लागले आहेत.



# राष्ट्रपतींकडून कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे दर्शन

**कोल्हापूर :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी करवीर निवासिनी महालक्ष्मीचे दर्शन घेतले. त्यांनी देवीला कुंकुमार्चन, अभिषेक करून विधिवत पूजा केली. एकारती, पंचारती व कर्पुरआरती केली. या वेळी त्यांच्याबरोबर त्यांची कन्या इतिश्री मुर्मू व भाऊ तारिणीसेन टुडू यांनीही देवीचे दर्शन घेतले. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय युवा व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, खासदार धैर्यशील माने आदी यावेळी उपस्थित होते.

देवस्थान समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी राष्ट्रपती मुर्मू व राज्यपाल राधाकृष्णन यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. राष्ट्रपती मुर्मू यांनी जिल्हाधिकारी येडगे यांच्याकडून या मंदिराविषयी माहिती जाणून घेतली. मंदिरातील दगडी झुंबर व शिल्पकलेची पाहणी केली. कोल्हापूरच्या मंदिरात दर्शन घेणाऱ्या मुर्मू या पहिल्याच राष्ट्रपती आहेत.

**राष्ट्रपती आज मुंबईत**

महाराष्ट्र विधान परिषद शतक महोत्सवानिमित्त मंगळवारी विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या उपस्थित राहणार आहेत.

त्यांच्या हस्ते 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहातील सदस्यांना 'उत्कृष्ट संसदपटू' आणि 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कारही मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील. आधुनिक काळात सहकार तत्व वाढीस लागले आहे. भारताच्या प्राचीन संस्कृतीतही सहकार तत्त्वाची मूल्ये आढळून येतात. वारणा सहकार समूहाने याच मूल्यांमधून सहकार क्षेत्राला आधुनिकतेची दिशा दिली आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. वारणा विद्यापीठ उद्घाटन समारंभ सोमवारी वारणा नगर येथे राष्ट्रपतींच्या उपस्थित पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या.

# आबांनी आपल्या वाणीने समाजातील सामान्य माणूस आपलेपणाने जोडला : आ. सुमनताई पाटील

सावळज परिसरातील या महाविद्यालयाला आबांच मोठं योगदान लाभलेलं आहे. आबांनी आपल्या वाणीने समाजातील प्रत्येक स्तरातील सामान्य माणूस आपलेपणाने जोडला होता. म्हणूनच प्रत्येकाला आबा हा आपला नेता आहे, असं वाटत होतं. त्यांनी आपल्या वक्तृत्व आणि कर्तृत्व या भांडवलावरच महाराष्ट्राच्या राजकारणात एक आगळावेगळा ठसा उमटवला होता. सर्वसामान्याच्या विश्वासावर आबा जिल्हा परिषदेचे सदस्य ते राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी पोहोचले होते. असेच नेतृत्व आपणाला उद्याच्या राजकारणात पाहायचे आहे. या मातीने जसं आबांना घडविले तसेच आज या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झालेल्यांना ही माती घडवेल हाच हेतू ठेवून ही स्पर्धा आज या महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्सहाने व मोठ्या प्रतिसादाने भरवलेली आहे.असं मला वाटते, असे मत तासगाव कवठेमंकाळ मतदार संघाच्या विद्यमान आमदार सुमनताई पाटील यांनी व्यक्त केले. स्वर्गीय आर.आर.(आबा) पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित

### आर.आर. पाटील महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न



राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन व आंतरविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव (उच्च शिक्षण विभाग) डॉ.के.एच. शिंदे होते. यावेळी सावळज ग्रामपंचायत सदस्या सौ.शोभा सुतार तसेच गावातील इतर मान्यवर उपस्थित होते.

बक्षीस वितरण समारंभ मध्ये या राज्यस्तरीय आंतरहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेली कु. प्रज्ञा श्रीकांत माळकर (श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली) द्वितीय कोळगे चैतन्य श्रीकांत (औद्योगिक प्रशिक्षण संस्था सांगली), तृतीय घाटपाडे साईराज मोहन (नवलमल फिरोदिया विधी महा पुणे), चतुर्थ माने अक्षदा राजेंद्र (न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज विटा) व उत्तेजनार्थ ऐवळे जयश्री भगवान(श्री रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय सावळज) व विशेष पारितोषिक सूर्यवंशी बुगंधरा देवदत्त. अंतरविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेला हेडगे प्रशराज आप्पा (धर्मवीर संभाजी विद्यालय देगाव), द्वितीय हात्तळगी तनिष्का प्रवीण (लक्ष्मीनारायण मालू हायस्कूल जयसिंगपूर),तृतीय माने गायत्री दीपक (रा.शा. माने पाटील महाविद्यालय विसापूर),चतुर्थ थिटेआर्यन मारुती (विद्यानिकेतन तासगाव) व उत्तेजनार्थ तोडकर तनिष्का मारुती (यशवंत आबा पाटील महाविद्यालय खुजगाव) या स्पर्धकांचे बक्षीस समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वसंत (बापू)सावंत यांच्या शुभहस्ते देण्यात आले. यावेळी वसंत बापू म्हणाले की, अशा या स्पर्धेतून आबा सारखी वाणी असणारे, भविष्यात नेतृत्व करणारे युवक घडतील त्यामुळे ही स्पर्धा अशीच दरवर्षी राबवून चांगले विचाराचे विद्यार्थी तयार व्हावेत हीच अपेक्षा ठेवून त्यांनी सहभागी स्पर्धकांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

या स्पर्धा दि सावळज ऑफ सोसायटी लि सावळजचे चेअरमन विवेक (राजू) सावंत तसेच स्वर्गीय आर. आर. आबा पाटील युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या सहकार्यातून पार पडली. या दोन्ही गटातील पहिली बक्षिसे ही श्री. आर.आर. (आबा) पाटील युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या सहकार्यातून देण्यात आली.या स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, बेळगाव,निपाणी या जिल्ह्यातून सुमारे ७० स्पर्धक सहभागी झाले होते. या आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण डॉ.सर्जेराव पद्माकर (डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पेठ वडगाव), डॉ. सुखदेव एकल (सहा. प्राध्यापक मराठी विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) तसेच आंतरविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण डॉ.लक्ष्मण शिंदे (मराठी विभाग मिरज महाविद्यालय मिरज), प्रा.श्रीराम सिताराम मोहिते (रिपब्लिक आयएएस अकॅडमी कोल्हापूर)यांनी केले.

स्पर्धेचे संयोजन,स्पर्धा समन्वयक डॉ.बळवंत मगदूम, सह समन्वयक डॉ. आप्पासाहेब सुतार,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ.एस.व्ही.पणदे तसेच सर्व सदस्यांनी केले.

### ऑस्ट्रेलियाला प्रथमच डाळिंब निर्यात

**पुणे :** देशातून ऑस्ट्रेलियाला प्रथमच डाळिंबाची निर्यात झाली आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रावरून १२९६ किलो डाळिंबाची निर्यात करण्यात आली. त्यामुळे डाळिंब उत्पादकांना नवी बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. पणन मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, ऑस्ट्रेलियाने २०२० मध्ये भारतातून डाळिंब आयातीला परवानगी दिली होती. त्यानंतर उभय देशांमध्ये आयात-निर्याती विषयीची कार्य योजना निश्चित होऊन स्वाक्षरी करण्यात आली होती.





**जय देवी हरतालिके,स खी पार्वती अंबिके..** असे म्हणत दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल तृतीयेला घरोघरी महिला हरतालिकेचे व्रत साजरे करतात .या साठी सखी, पार्वतीच्या आकर्षक शाडू मातीच्या व प्लास्टरच्या मूर्ती सध्या सातारा शहरातील मोती चौक राजवाडा परिसरात विक्रीस आल्या आहेत .यावर्षी शुक्रवारी ६ सप्टेंबरला हे व्रत साजरे होत आहे.. (फोटो ..अतुल देशपांडे, सातारा.)